MHWS070024172022

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३८४/२०२२
सैय्य्द निसार सैय्य्द महेमुद वि. नगर परिषद, कारंजा

## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३८४/२०२२ मध्ये नि.क्र.१ वरील आदेश

## (दिनांक २७/०३/२०२४ रोजी पारित)

१. सदरचा अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम च्या कलम १३ (३) प्रमाणे नगर परिषद, कारंजा (लाड) यांना अर्जदार नामे सैय्यद निसार सैय्यद महेमुद याच्या जन्माची नोंद जन्म रजिष्टरला घेणेबाबतचा आदेश पारित करण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

२. अर्जदाराचे म्हणणे थोडक्यात असे आहे की, अर्जदार हा कारंजा ता. कारंजा जि.वाशिम येथील कायमचा रहिवाशी असून त्याचा जन्म दिनांक ०२/०१/१९६२ रोजी कारंजा येथे झाला. परंतु, अनावधानाने व कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे अर्जदाराच्या जन्माची नोंद नगर परिषद कारंजा, ता.कारंजा, जि.वाशिम येथे केली नाही. अर्जदाराच्या जन्माची नोंद होणे शासकिय, निमशासकीय व खाजगी कामाकरीता आवश्यक आहे. म्हणुन, अर्जदाराने नगर परिषद कारंजा, ता.कारंजा, जि.वाशिम येथे जन्म नोंद प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला. परंतु, नगर परिषद कारंजा, यांनी अर्जदाराच्या जन्माबाबतची नोंद आढळुन येत नाही असे अनुउपलब्धता प्रमाणपत्र दिनांक २८/११/२०२२ रोजी दिले. त्यामुळे, अर्जदाराचा जन्म दिनांक ०२/०१/१९६२ रोजी झाल्याबाबतची नोंद होणे कामी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज

दाखल केला आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात नोटीस काढल्यानंतर सामनेवाले हजर झाले. परंतु, त्यांनी सदर अर्जाला कोणताही विरोध दर्शविला नाही. सामनेवाले यांनी निशाणी क्र.०७ वर त्यांचा खुलासा दाखल करून असे कथन केले की अर्जदाराच्या जन्माची नोंद त्यांच्या अभिलेखात आढळून आली नाही.

४. अर्जदाराने सदर प्रकरणात पुरावा म्हणुन स्वतःचे शपथपत्र निशाणी क्र.०८ वर, अर्जदाराच्या जन्माची नोंद रजिष्टरला नसलेबाबतचा दिलेले प्रमाणपत्र निशाणी क्र.०९, अर्जदाराचे स्वतःचे मुळ आधारकार्डवरून पडताळणी केलेली आधारकार्डची छायांकित प्रत निशाणी क्र.१० व अर्जदाराच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची व्हेरीफाईड प्रत निशाणी क्र. ११ वर असे दस्त दाखल केले आहेत. सदरहु पुरावा हा अर्जाच्या कथनाशी सुसंगत असाच आहे. त्याचप्रमाणे अर्जदाराने निशाणी क्र.१२ वर दिनांक १२/०१/२०२३ रोजीचे ‘दैनिक सायरन’ या वर्तमानपत्रामध्ये नोटीस प्रसिध्द केलेले वर्तमानपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे.

५. वरील सर्व कागदोपत्री पुराव्यावरून असे स्पष्ट होते की, अर्जदार नामे सैय्यद निसार सैय्यद महेमुद याचा जन्म कारंजा, ता.कारंजा, जि.वाशिम येथे दिनांक ०२/०१/१९६२ रोजी झालेला असून त्याच्या जन्माची नोंद मुख्याधिकारी नगर परिषद कारंजा, ता.कारंजा, जि.वाशिम यांचे कार्यालयात झालेली नाही. सबब, अर्ज मंजूर करून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मुख्याधिकारी नगर परिषद कारंजा, ता.कारंजा(लाड), जि.वाशिम यांनी अर्जदार नामे सैय्यद निसार सैय्यद महेमुद यांचा जन्म कारंजा ता. कारंजा, जि. वाशिम येथे दिनांक ०२/०१/१९६२ रोजी झाल्याची नोंद आपले जन्म नोंद रजिष्टरला योग्य ती फी अर्जदाराकडून घेऊन करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI
Date: 2024.03.30 16:26:51 +0530

**(श्री. एम. एच. हक)**

दिनांक २७/०३/२०२४.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कारंजा (लाड).

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | K.A. Paraswai (Stenographer-III) |
| Court Name | :- | Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 27/03/2024 |
| Order signed by the presiding officer on | :- | 27/03/2024 |
| Order uploaded on | :- | 30/03/2024 |